सामना पा.नं. १५४.

# राज्यपाल कोश्यारी यांची जीभ घसरली; छत्रपती शिवाजी महाराजांचा पुन्हा एकेरी उल्लेख



***राज्यपाल नेमके काय म्हणाले...***

*"सब लोग कहते हैं की शिवाजी होने चाहीए, चंद्रशेखर होने चाहीए, भगतसिंह होने चाहीए, नेताजी होने चाहीए, लेकीन मेरे घरमें नही तो दुसरे के घरमे होने चाहीए", असे वक्तव्य राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी हिंदीमध्ये केले. त्यानंतर राज्यपाल स्वत:च जोरात हसल्याचे या व्हिडीओत स्पष्टपणे दिसत आहेत.*

मुंबई, दि. ७ (प्रतिनिधी)- राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी आज पुन्हा एकदा छत्रपती शिवाजी महाराजांचा एकेरी उल्लेख केल्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. त्यामुळे राज्यपाल कोश्यारी परत एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडले आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार अमोल मिटकरी यांनी त्यांच्या ट्विटर अकाऊंटवरून राज्यपालांच्या भाषणाचा हा व्हिडीओ ट्विट केला आहे.

**राज्यपालांच्या मनात काय आहे?**

अमोल मिटकरी यांनी या व्हिडीओसोबत ट्विटही केले आहे. त्यात 'राज्यपाल महोदयांकडून मुंबई येथे राजभवनातील कार्यक्रमात परत एकदा छत्रपती शिवाजी महाराज व इतर महापुरुषांचा ▪ पान ४

## कोश्यारींची वादग्रस्त विधाने...

*समर्थ रामदासांविना शिवाजी महाराजांना कोण विचारेल? गुरूंचे आपल्या समाजात मोठे स्थान असते, तसेच छत्रपतींनी मला माझे राज्य तुमच्या कृपेने मिळाले आहे, असं समर्थांना म्हटले होते.*

*जेव्हा महात्मा फुले आणि सावित्रीबाई यांचे लग्न झाले तेव्हा ते १३ आणि १० वर्षांचे होते. त्या वयात मुलगा, मुलगी काय करतात.*

*छत्रपती शिवाजी महाराज हे तर जुनेपुराणे झाले आहेत. आता तरुणांनी नवीन आदर्श शोधले पाहिजेत.*

*महाराष्ट्रामध्ये, विशेषकरून मुंबई आणि ठाण्यातून गुजराती किंवा राजस्थानी लोकांना काढून टाकले तर तुमच्याकडे पैसेच उरणार नाहीत.*

## कोश्यारी यांची जीभ घसरली, छत्रपती शिवाजी महाराजांचा पुन्हा एकेरी उल्लेख

*(पान १ वरून)* एकेरी उल्लेख. नेमके राज्यपालांच्या मनात चाललंय तरी काय आता तरी मुख्यमंत्री खुलासा करतील का ?' असा प्रश्न अमोल मिटकरींनी केला आहे.

या संदर्भात माध्यमांशी बोलताना अमोल मिटकरी म्हणाले की, राज्यपाल महापुरुषांबद्दल एकेरी उल्लेख करतात, त्यांनी काय लावलंय महाराष्ट्रात शेवटी आमची हीच भूमिका आहे की, आता पर्दाफाश करण्याची वेळ आलेली आहे. महाराष्ट्राच्या जनतेला हे कळू द्या की, कशा प्रकारे राज्यपाल उद्धटपणे वागत आहेत

**राजीनाम्याच्या मागणीसाठी निघाला होता महाविराट मोर्चा**

महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतिबा फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले अशा महापुरुषांचा राज्यपाल आणि भाजपच्या नेत्यांकडून होणारा अपमान आणि सातत्याने भाजपकडून होणारी त्याची पुनरावृत्ती या विरोधात महाविकास आघाडीने १७ डिसेंबर रोजी मुंबई महाविराट मोर्चाही काढला होता.

पुण्यनगरी पु.पा.७.

## प्लास्टिक वापरावर दंडात्मक कारवाई

**। मीरारोड :** मीरा-भाईंदर शहरात प्लास्टिक विक्री तसेच रस्त्यावर कचरा टाकणाऱ्यांवर कारवाई करण्यात येते. प्रभाग क्रमांक मध्ये प्लास्टिकचा वापर व विक्री करणाऱ्यांवर संयुक्त कारवाई करत १५,००० रुपये दंड जमा करून जवळपास ९ किलो प्लास्टिक जमा करण्यात आले. त्याच बरोबर विशेष दंड ४५०० रुपये व रस्त्यावर कचरा टाकणाऱ्यांकडून ५५० रुपये दंड वसूल करण्यात आला. एकूण २०,०५० रुपये दंड वसूल करण्यात आला आहे. ही कारवाई स्वच्छता निरीक्षक रवींद्र पाटील, मनपा मुकादम जयसिंग सोळंकी, भरत जाधव, ठेका मुकादम कल्पेश गुरव, अली खान व कामगार वर्ग यांच्या सहाय्याने करण्यात आली.

## बेवारस वाहनांवर पालिकेची कारवाई

**। मीरा रोड :** मीरा-भाईंदर शहरात गल्लोगल्लीत धूळखात पडलेली बेवारस वाहने वाहतुकीस अडथळा ठरत असल्याने महापालिकेने कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. महापालिकेने नयानगर परिसरात रस्त्यावर धूळखात उभ्या असलेल्या ६ ऑटो रिक्षा, २ चारचाकी, २ टेम्पो अशा ८ बेवारस वाहने उचलून त्यांना पालिकेच्या गोडाऊनमध्ये जमा करण्यात आली आहेत. या बेवारस वाहनांवर कारवाई करत २०,००० रुपये दंड आकारण्यात आला आहे. ही कारवाई महापालिका प्रभाग क्र. ४ कार्यक्षेत्रातील नरेंद्र चव्हाण अतिक्रमण विभागप्रमुखांच्या आदेशाने करण्यात आली असून, या वेळी योगेश गुनिजन सहाय्यक आयुक्त यांनी केली आहे.

पुण्यनगरी पु.पा.७.

## महिला तक्रार निवारणासाठी पोलीस पुनःधैर्य योजना राबवणार

**। मीरा रोड :** मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील पोलीस ठाणे येथे महिलांच्या तक्रारींच्या अनुषंगाने सखोल व यथोचित कार्यवाही होण्याच्या दृष्टिकोनातून 'पुनःधैर्य योजना' राबवणार आहेत. पोलीस ठाणे येथे महिलांच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर चौकशीच्या अनुषंगाने तक्रारदार व गैरअर्जदार यांना समक्ष पोलीस ठाण्यात बोलावून कायदेशीर कार्यवाही करण्यात येते किंवा काही प्रकरणांमध्ये महिला तक्रारदार व गैरअर्जदार यांच्यामध्ये समेट किंवा तडजोड होऊन प्रकरण निकाली काढण्यात येते. मात्र, काही प्रकरणांमध्ये त्या तक्रारी निकाली काढल्यानंतर थोड्या दिवसांनंतर तक्रारदार महिलांना गैरअर्जदार यांच्याकडून परत त्रास होण्याची शक्यता असते. त्यामुळे अशा घटनांना आळा घालण्यासाठी पोलीस आयुक्तांच्या आदेशानुसार 'पुनः धैर्य योजना' राबवण्यात येणार असून, आयुक्तालयातील पोलीस ठाणे येथे मागील एक वर्षापासून प्राप्त तक्रारींमधील महिलांना पोलीस ठाणे येथे बोलावून किंवा त्यांच्याशी संपर्क करून सध्या त्यांना गैरअर्जदार यांच्याकडून कुठल्याही प्रकारचा त्रास अथवा छळवणूक होत असल्यास त्याबाबत विचारणा करण्यात येऊन योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात येणार आहे. हा उपक्रम दर शनिवारी राबवण्यात येणार असून महिला पोलीस अधिकारी, अंमलदार हे तक्रारी हाताळणार आहेत. विभागीय सहा. पोलीस आयुक्त यांचे पर्यवेक्षण व परिमंडळीय पोलीस उपआयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली ही योजना राबवण्यात येणार असून, पोलीस आयुक्त या योजनेचा आढावा घेणार आहेत.

लोकमत पु.पा.४.

## गैरप्रकाराविरुद्ध उपोषण

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा-भाईंदर शहरातील विविध गैरप्रकार व कारवाईविरुद्ध जिद्दी मराठा प्रतिष्ठानच्या माध्यमातून बेमुदत साखळी उपोषण सुरू केले आहे. पालिकेच्या शाळा दहावीपर्यंत सुरू करणे, महाविद्यालय सुरू करावे, आयुक्तांनी नव्याने लावलेला पथकर हा नियमबाह्य असून पूर्वी भाजप सत्तेत असताना दोन वेळा करवाढ केल्याने १० टक्के रस्ता कर रद्द करावा. गोल्डन नेस्टजवळील आरक्षण क्र २५४ हे उद्यानासाठी आरक्षित असताना तीन वर्षे उलटून गेले तरी अद्याप ७११ कन्स्ट्रक्शन व संबंधिताकडून उद्यानाची जागा मोकळी करून घेण्यास टाळाटाळ केली जात आहे.

गोल्डन नेस्ट आराखड्यात दर्शवल्याप्रमाणे अंतर्गत रस्त्यावर अतिक्रमण करून माजी भाजप आमदार नरेंद्र मेहतांनी स्वतःच्या राहत्या घराचे गार्डन, कार्यालय आदी बेकायदा बांधकामांना पालिका संरक्षण देत आहे. ही बांधकामे हटवून नागरिकांकरिता रस्ता मोकळा करावा, अशी मागणी आंदोलकांनी केली आहे.

सामना पा.नं. ५.

## १२८ किमीच्या मार्गासाठी ५२ हजार कोटींचा खर्च

# विरार-अलिबाग कॉरिडोरचा नारळ फेब्रुवारीत फुटणार

### बलावली (वसई) ते पेण (रायगड) पहिला टप्पा

**उरण, दि. ७ (सा.वा.) - विरार-अलिबाग या बहुचर्चित कॉरिडोरचा नारळ फेब्रुवारीत फुटणार आहे. १२८ किमी लांबीचा आणि ५२ हजार कोटी रुपये खर्चाच्या या प्रकल्पाचा पहिला टप्पा बलावली (वसई) ते पेण (रायगड) असा ९८.५० किमी लांबीचा असणार आहे. एमएसआरडीसीला जानेवारीअखेर सर्व परवानग्या मिळतील, असा विश्वास एमएसआरडीसीचे व्यवस्थापकीय संचालक राधेश्याम मोपलवार यांनी व्यक्त केला आहे. त्यामुळे आता पुढील महिन्यात फेब्रुवारीत या कॉरिडोरच्या पहिल्या टप्प्याचे काम वेगात सुरू होणार आहे.**


विरार-अलिबाग हा १२८ किमी लांबीचा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प एमएमआरडीएने १९ ऑगस्ट २०२० रोजी एमएसआरडीसीकडे हस्तांतरित केला. हा कॉरिडोर राज्य महामार्ग क्रमांक ४ म्हणून घोषित करण्यात आला आहे.

### हा फायदा होणार

विरार-अलिबाग कॉरिडोर मार्ग मुंबई प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रातून प्रस्तावित आहे. त्यामुळे मुंबई महानगर प्रदेशाचा सर्वांगीण विकास होणार आहे. तसेच गृहनिर्माण, औद्योगिक विकास, केंद्रीभूत विकास व कृषी मालासाठी बाजारपेठ उपलब्ध होणार आहे. सुलभ दळणवळण, रोजगारनिर्मिती, प्रदूषण नियंत्रण, इंधन बचत, वाहतूककोंडीतून सुटका, सुनियोजित शहरीकरण, पायाभूत सुविधा निर्मिती, जीवनमान सुधारणा या विकासासाठी हा प्रकल्प सहाय्यभूत ठरणार आहे.

### चार टप्प्यात काम

पहिला टप्पा ९८.५० किमी लांबीचा आहे. या प्रकल्पाची नवघर ते अंजूर, अंजूर ते मोर्बे, मोर्बे ते दापोली, दापोली ते बलावली अशा चार भागात कामाची विभागणी करण्यात आली आहे. प्रस्तावित रस्ता दोन्ही बाजूला ४x४, ६x६ लेनचे आहेत. रस्त्याची रुंदी २६.५० मीटर आहे. ही रुंदी भविष्यात येऊ घातलेल्या मेट्रो व रुंदीकरणासाठी प्रस्तावित करण्यात आली आहे. निधीच्या उपलब्धतेनुसार प्रकल्प टप्पाटप्प्याने पूर्ण करण्यात येणार आहे.



### प्रलंबित परवानग्या

प्रकल्पाच्या ९८.५० किमी लांबीच्या पहिल्या टप्प्याच्या कामासाठी पर्यावरण विभाग, सीआरझेड, वन्यजीव व वनविभागाच्या मंजुरी घेण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली असून सर्व परवानग्या या जानेवारी २०२३ अखेरीस प्राप्त होणे अपेक्षित आहे.

### प्रकल्पाचा अंदाजे खर्च

या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी ५२ हजार रुपये खर्च अपेक्षित आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या ९८.५० किमी लांबीच्या पहिल्या टप्प्याच्या कामाला फेब्रुवारीत सुरुवात होईल. कामाला सुरुवात झाल्यानंतर तीन वर्षांच्या मुदतीत प्रकल्पाचे काम पूर्णत्वास जाईल, असा विश्वास एमएसआरडीसीचे व्यवस्थापकीय संचालक राध्येशाम मोपलवार यांनी व्यक्त केला आहे.

- विरार-अलिबाग कॉरिडोर वसई, भिवंडी, कल्याण, अंबरनाथ, पनवेल, उरण, पेण व अलिबाग तालुक्यातून जाणार आहे.
- या प्रकल्पाचा पहिला टप्पा मौजे बलावली (वसई) येथून पेण (रायगड) इथपर्यंत होणार असून हा टप्पा ९८.५० किमी लांबीचा आहे.
- या प्रकल्पामुळे वसई, भिवंडी, कल्याण, डोंबिवली, पनवेल, उरण आणि तळोजा या सात एमआयडीसींच्या विकासासाठी मदत होणार आहे.
- हा प्रस्तावित कॉरिडोर जेएनपीए, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, मुंबई ट्रान्सहार्बर लिंकशी जोडला जाणार आहे. तसेच मुंबई-आग्रा महामार्ग, कल्याण-मुरबाड-निर्मळ राष्ट्रीय महामार्ग, तळोजा बायपास, मुंबई-बडोदा एक्स्प्रेस वे, मुंबई-पुणे एक्सप्रेस वे, मुंबई-बंगळुरू राष्ट्रीय महामार्ग, पनवेल-उरण राष्ट्रीय महामार्ग, मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग या महत्त्वाच्या रस्त्यांनाही जोडणार आहे.

### भूसंपादन प्रक्रिया

पालघर, ठाणे, रायगड जिल्ह्यातील १०६ गावे बाधित होत आहेत. या तीनही जिल्ह्यातील बाधित गावातील शेतकऱ्यांकडून सुमारे १३४७.२१ हेक्टर जमिनी संपादित करण्यासाठी भूसंपादन प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. यापैकी ९० गावांमध्ये सेवा रस्तेसहित संयुक्त मोजणीचे काम पूर्ण झाले आहे.

सकाळ पु.पा.१.



# तुंगारेश्वर अभयारण्यात पर्यटकांनो फिरा मनसोक्त

प्रसाद जोशी, वसई

**वसईतील पर्यटन क्षेत्र म्हणून ओळख असलेल्या तुंगारेश्वर अभयारण्यात वनविभागाकडून आकारली जाणारी प्रवेश फी अधिक होती ; पण आता तुंगारेश्वर येथे येणाऱ्या पर्यटकांकडून आकारण्यात येणारा प्रवेश दर कमी केल्याने येथे पर्यटकांची रेलचेल वाढणार आहे. त्यामुळे मुंबई, ठाण्यासह आसपासच्या भागातून येणाऱ्या पर्यटकांची संख्या वाढण्यास मदत होणार आहे.**

वसई पूर्वेकडील तुंगारेश्वर अभयारण्य आहे. या ठिकाणी मुंबई, ठाण्यातून पर्यटक मोठ्या संख्येने येतात. तसेच या परिसरात ऐतिहासिक महादेव मंदिरदेखील असल्याने भाविकांची रेलचेल सुरू असून पावसाळ्यात फेसाळत वाहणारे धबधबे पर्यटकांना आकर्षित करतात; परंतु या ठिकाणी वनविभागाकडून आकरण्यात येणारी प्रवेश फी अधिक होती. त्यामुळे प्रवेश दरात सूट मिळावी म्हणून तुंगारेश्वर मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष रमेश घोरकना, माजी सभापती कन्हय्या भोईर, माजी नगरसेवक मिलिंद घरत व शिष्टमंडळाने आमदार हितेंद्र ठाकूर व राजेश पाटील यांच्याकडे पाठपुरावा केला. तसेच ही बाब लक्षात घेत वनमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिल्यावर येथील फी कमी करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार संजय गांधी उद्यानाचे वनरक्षक व संचालक मल्लिकार्जुन यांनी याबाबत आदेश काढले आहेत.

तुंगारेश्वर अभयारण्यात सुविधांचा अभाव आहे. त्यात प्रवेश फी अधिक आकारण्यात येत होती. म्हणून वनविभागाने दर कमी करावेत व नागरिकांना सुविधा द्याव्यात, यासाठी केलेल्या मागणीला यश आले आहे.
- रमेश घोरकना, अध्यक्ष, तुंगारेश्वर मंदिर देवस्थान ट्रस्ट

वनक्षेत्रात येणारे पर्यटक व भाविकांना असुविधांचा सामना करावा लागतो म्हणून वनमंत्र्यांनी भेट घेऊन सविस्तर चर्चा करण्यात आली. यात प्रवेश आकारणी कमी करण्याचा तसेच सुविधा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
- राजेश पाटील, आमदार

सकाळ पु. पा. ९.

# ज्येष्ठ नागरिकांना पोलिसांनी दिला मदतीचा हात

प्रकाश लिमये, भाईंदर

**ज्येष्ठ नागरिक हे गुन्हेगारांचे सॉफ्ट टार्गेट असतात. रस्त्यात अथवा घरात एकटे गाठून त्यांना लुबाडणे, एटीएम केंद्रात त्यांची फसवणूक करणे असे गुन्हे सर्रास घडतात. त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांना अशा गुन्ह्यांपासून कसे वाचवायचे, पोलिसांशी कसा संपर्क साधायचा, याचे मार्गदर्शन पोलिस स्थापना दिन सप्ताहानिमित्त ज्येष्ठ नागरिकांना मिरा रोड येथे देण्यात आले.**

अनेक ज्येष्ठ नागरिकांना सकाळी अथवा सायंकाळी फिरायला जाण्याची सवय असते. अशा ज्येष्ठ नागरिकांवर पाळत ठेवून त्यांच्या गळ्यातील सोनसाखळ्या खेचून नेल्या जातात किंवा आपण पोलिस आहोत, पुढे एक गंभीर गुन्हा घडला आहे, तुमच्या अंगावरील सोन्याचे दागिने आमच्याकडे सुरक्षित ठेवा, अशी बतावणी करूनही ज्येष्ठ नागरिक लुबाडले जाते. तसेच घरात एकटे राहणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांची घरे लुटल्याचे गुन्हे अनेक वेळा घडले आहेत. एटीएम केंद्रात पैसे काढायला गेलेल्या वरिष्ठ नागरिकांवर तर गुन्हेगारांचे विशेष लक्ष असते. एटीएम केंद्रात पैसे काढण्यासाठी ज्येष्ठ नागरिकांना अनेक वेळा तांत्रिक अडचण येते. एटीएम कार्ड यंत्रात व्यवस्थित टाकले नाही, तर यंत्रातून पैसे बाहेर येत नाहीत. अशा वेळी मदत करण्याच्या बहाण्याने गुन्हेगार पुढे सरसावतात व शिताफीने हातचलाखी करून त्यांच्या बँक खात्यातून पैसे काढतात. ज्येष्ठ नागरिकांची ऑनलाईन फसवणूक झाल्याचेही गुन्हे घडत असतात. गुन्हा घडल्यानंतर तत्काळ पोलिसांशी संपर्क कसा करायचा, याची माहिती ज्येष्ठ नागरिकांना नसते. त्यामुळे गुन्हेगार पसार होतात. अशा



भाईंदर : पोलिस स्थापना दिनानिमित्त फसवणूक टाळण्यासाठी ज्येष्ठ नागरिकांना मार्गदर्शन करण्यात आले.

ज्येष्ठ नागरिकांनी सतर्क कसे राहावे, हे गुन्हे कसे घडतात, त्यातून फसवणूक होऊ नये, यासाठी काय खबरदारी घ्यावी, सकाळी - सायंकाळी फिरायला जाणाऱ्यांनी काय काळजी घ्यावी, यासंदर्भात पोलिसांकडून ज्येष्ठ नागरिकांना सविस्तर माहिती देण्यात आली.

## संकटकाळी ११२ वर संपर्क साधा

पोलिसांशी तत्काळ संपर्क साधण्यासाठी डायल ११२ ही सुविधा सुरू करण्यात आली आहे. या क्रमांकावर संपर्क साधल्यास अवघ्या काही मिनिटांत पोलिस घटनास्थळी दाखल होतात. त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांनी या सुविधेचा अवश्य वापर करून पोलिसांची तत्काळ मदत मिळवावी, असे आवाहन पोलिसांनी यावेळी केले. ज्येष्ठ नागरिकांना येणाऱ्या अडचणी व त्यांच्या समस्याही पोलिसांनी यानिमित्त समजावून घेतल्या.

# Police to scan all complaints lodged by women last year

SURESH GOLANI / Mira Bhayandar

Even as a special investigation team probes the alleged delay by the Tulinj police station in registering a case on a complaint by Shraddha Walkar two years ago, after which she withdrew it, the MBVV Police has decided to scan pending complaints by women.

SHRADDHA WALKAR EFFECT

Under the 'Punha Dhairya' scheme, Police Commissioner Madhukar Pandey, who recently took charge, has directed the senior inspectors of all 16 police stations in the MBVV commissionerate to check the status of all cases, applications and complaints filed by women in the past year.

"We are checking all such complaints to ensure that none of the complainants is facing any ordeal from their tormentors," said one inspector who has set up a special team to scan all the complaints at his station and communicate with the complainants. "Immediate action will be taken if we detect any type of harassment or threat," he said.

Ms Walkar was allegedly strangled to death by her live-in partner Aaftab Amin Poonawala at their house in Chattarpur, Delhi, in May 2022, cut up into pieces, refrigerated and disposed of over several months.

THE FREE PRESS JOURNAL Sun, 08 Jar https://epa

मुंबई चौफेर

# वर्षभरात पाचशेहून अधिक अपहृत मुलांना शोधण्यात पोलिसांना यश

भाईंदर - मीरा-भाईंदर व वसई-विरार पोलीस आयुक्तालय सखोल तपास करून न्यायालयात दोषारोपपत्र सादर केल्यानंतर आरोपींना दोषी ठरवण्यात पुढे आहे. याच कामासाठी आयुक्तालयाचा गुन्हे दोषसिद्ध करण्यामध्ये महाराष्ट्रात ८९.६३ % गुण प्राप्त करत प्रथम क्रमांक आला आहे. मीरा-भाईंदर व वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात १ जानेवारी २०२२ ते ३१ डिसेंबर २०२२ या कालावधीत कलम ३६३ प्रमाणे अठरा वर्षांच्या आतील ६५० मुले-मुली हरवल्याचे गुन्हे दाखल होते. त्यापैकी (१९६) मुली व (४५४) मुलांचा समावेश होता. यापैकी एकूण ५८२ जणांना शोधण्यास मीरा-भाईंदर व वसई-विरार पोलिसांना यश मिळाले आहे. प्रलंबित ६८ जणांचा देखील पोलीस तपास करत आहेत. मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाची स्थापना १ ऑक्टोबर २०२० मध्ये करण्यात आली आहे. त्यावेळी स्थापन झालेल्या मीरा-भाईंदर व वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे पोलीस आयुक्त म्हणून सदानंद दाते यांची नियुक्ती करण्यात आली होती. त्यांच्या नियुक्तीनंतर या आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्याचे काम त्यांनी केले आहे. महाराष्ट्रात गुन्हेगारीच्या प्रमाणात वाढ होत आहे. ही वाढती गुन्हेगारी रोखण्यासाठी पोलीस कारवाई करण्यामध्ये देखील आघाडीवर आहेत. पोलीस कारवाई करत असल्यामुळे कायदा व सुव्यवस्था राखली जात आहे. मीरा-भाईंदर व वसई-विरार शहरात पूर्वी गुन्हेगारीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात होते. ही गुन्हेगारी आटोक्यात आणण्यासाठी पोलीस आयुक्तालयाची स्थापना करण्यात आली. सदानंद दाते यांनी आयुक्तालयाची सूत्रे सांभाळताना गुन्हेगारी रोखण्यासाठी भर दिला होता. अधिकारी, कर्मचारी यांना काम करण्यासाठी वेगळे प्रोत्साहन दिले होते. दोन वर्षांचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर आता मीरा-भाईंदर व वसई-विरार पोलीस आयुक्त सदानंद दाते यांची बदली झाली असून, त्यांच्या जागी पोलीस आयुक्त म्हणून मधुकर पांडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पांडे यांनी आयुक्त पदाचा कारभार हाती घेताच शहरातील गुन्हेगारी पूर्णपणे संपवण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. मीरा-भाईंदर व वसई-विरार शहरात पोलीस आयुक्तलयाची स्थापना झाल्यापासून गुन्हेगारीचे प्रमाण कमी झाल्यामुळे लोकांकडून पोलिसांचे कौतुक केले जात आहे.

MumbaiChoufer Edition
Jan 8, 2023 Page No. 3
Powered by : eReleGo.com

# मारहाण करून लुटणारे तीनजण अटकेत

भाईंदर - नवघर पोलीस ठाण्याच्या हद्दीत गाडीच्या मिररचा धक्का लागल्याच्या बाहाण्याने सुरू असलेल्या वादात तीन अनोळखी इसमांनी गाडी मालकाला मारहाण करत त्याच्या जवळील मोबाइल फोन, चेन, रोख रक्कम असा एकूण ४ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल चोरी करून पळ काढल्याची घटना शुक्रवारी रात्री १०.३० वाजण्याच्या सुमारास फाटक रोड येथे घडली होती. याबाबत गाडी मालक प्रदीपसिंह गोहिल यांनी तीन अनोळखी इसमांविरुद्ध नवघर पोलीस ठाण्यात कलम ३९४, ५०४, ५०६, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल केला होता. तक्रार दाखल होताच नवघर पोलिसांनी त्यांचा शोध घेत काही तासांतच तिघांना अटक करण्यात आली आहे. त्यांच्याकडून अद्याप मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला नसून नवघर पोलीस पुढील तपास करत आहेत.

**न्यूज Inbox**

## हँडल लॉक केलेली दुचाकी चोरीला

**नालासोपारा** : ओस्तवालनगरच्या मंगलमूर्ती अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या करण शर्मा (१८) या तरुणाची ६० हजार रुपये किमतीची दुचाकी चोरीला गेली आहे. २ जानेवारीच्या रात्री तो दुचाकीने महामार्गावरील उत्तर भारतीय ढाबा येथे जेवणासाठी गेला होता; पण वाटेतच दुचाकीतील पेट्रोल संपले म्हणून सातीवली ब्रिजच्या बाजूला असलेल्या सर्व्हिस रोडवर दुचाकी हँडल लॉक करून घरी आला. ३ जानेवारीच्या सकाळी तेथे दुचाकी आढळ नाही. आजूबाजूलाही शोध घेतला; पण ती न सापडल्याने वालीव पोलिस ठाण्यात तक्रार देऊन वाहनचोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

## लग्नाचे आमिष दाखवून महिलेवर बलात्कार



**नालासोपारा** : लग्नाचे आमिष दाखवून नालासोपारा येथील एका ३२ वर्षीय महिलेवर बलात्कार केल्याची घटना समोर आली आहे. आरोपीने लग्नाचे आमिष दाखवून डिसेंबर २०२२ ते ३ जानेवारी २०२३ दरम्यान कळंब बीच, नालासोपाऱ्यातील लॉज, तसेच कंपनीत तिच्यावर लैंगिक अत्याचार केला होता; मात्र त्यानंतर त्याने तिला मारहाण व शिवीगाळ केली होती. पीडित महिलेने फसवणूक झाल्याबद्दल शुक्रवारी अर्नाळा पोलिस ठाण्यात तक्रार देऊन गुन्हा दाखल केला आहे.

लोकमत

# महिलांच्या तक्रार निवारणासाठी 'पुन: धैर्य योजना'

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा** : मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालयातील पोलिस ठाणे येथे महिलांच्या प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने सखोल व यथोचित कार्यवाही होण्याच्या दृष्टिकोनातून 'पुन: धैर्य योजना' राबविण्यात येणार आहे.

पोलिस ठाणे येथे महिलांच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांना समक्ष पोलिस ठाणे येथे बोलावून कायदेशीर कार्यवाही करण्यात येते. काही प्रकरणांमध्ये महिला तक्रारदार व संबंधितांमध्ये समेट किंवा तडजोड होऊन प्रकरण निकाली काढण्यात येते. मात्र, काही प्रकरणांमध्ये तक्रारदार महिलांना गैरअर्जदार यांच्याकडून परत त्रास होण्याची शक्यता असते. त्यामुळे अशा घटनांना आळा घालण्याकरिता पोलिस आयुक्तांच्या आदेशानुसार 'पुन: धैर्य योजना' राबविण्यात येणार आहे. मागील एक वर्षापासून प्राप्त तक्रारींमधील महिलांशी संपर्क करून सध्या त्यांना त्रास अथवा छळवणूक होत असल्यास योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात येणार आहे.

हा उपक्रम दर शनिवारी राबविण्यात येणार असून, महिला पोलिस अधिकारी तक्रारी हाताळणार आहेत.

Hello Vasai
Page No. 1 Jan 08, 2023
Powered by: erelego.com


लोकमत

# शिजानच्या जामिनावर उद्या पुन्हा सुनावणी

## अभिनेत्री तुनीषा शर्मा आत्महत्या प्रकरण

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** टीव्ही अभिनेत्री तुनीषा शर्मा मृत्यूप्रकरणी आरोपी अभिनेता शिजान खानच्या जामीन अर्जावर शनिवारी वसई न्यायालयात सुनावणी झाली.



मात्र, ही चर्चा पूर्ण झाली नाही. त्यामुळे न्यायालयाने पुढील तारीख ९ जानेवारी निश्चित केली आहे. आता दोन दिवसांनी या खटल्यात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून त्यानंतर तुरुंगात राहायचे की जामीन याचा निर्णय होणार आहे.

तपास अधिकाऱ्याने याप्रकरणी आपले म्हणणे वसई न्यायालयात सादर केलेले नाही. दुसरीकडे, ३१ डिसेंबरला न्यायालयाने शिजानच्या न्यायालयीन कोठडीत १४ दिवसांची म्हणजेच १३ जानेवारीपर्यंत वाढ केली होती. शिजान खान सध्या ठाणे येथील मध्यवर्ती तुरुंगात आहे. शिजानच्या जामीन अर्जावर सुनावणी दरम्यान न्यायालयात सरकारी वकिलांनी जामिनाला विरोध केला. तुनीषाचा परिवार चंडीगड येथे अंतिम संस्काराच्या काही पूजा व शांतीपाठसाठी गेलेला आहे. तसेच तिचे वकील ही उच्च न्यायालयात एका प्रकरणाच्या सुनावणीसाठी गेल्याचे वसई न्यायालयाला त्यांनी निदर्शनास आणून दिले. सुनावणी दरम्यान असा युक्तिवाद करण्यात आला की, शिजानने त्याचे अनेक व्हॉट्सॲप चॅट्स डिलीट केले होते. जे नुकतेच त्याच्या अन्य मैत्रिणीच्या फोनवरून मिळविले आहेत. या प्रकरणाचा अजून तपास होणे बाकी आहे.

तुनीषाचा सहकलाकार आणि प्रियकर शिजानवर अभिनेत्रीला आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा आरोप आहे. त्यामुळे त्याला वसई न्यायालयाने जानेवारीत १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली होती. कोर्टात शिजानच्या वकिलाने तो निर्दोष असल्याचे सांगितले. शिजान आणि त्याचे कुटुंबीय पोलिसांच्या नाकर्तेपणाचे बळी आहेत. न्यायव्यवस्थेवर आम्हाला पूर्ण विश्वास आहे. पोलिसांनी अटकेच्या अधिकाराचा गैरवापर वापर केल्याचे शिजानचे वकील शैलेंद्र मिश्रा यांनी पत्रकारांना सांगितले.

### 'सिक्रेट गर्लफ्रेंड'चा फोन केला जप्त

**पोलिसांनी शिजान आणि त्याची ' गुप्त मैत्रीण ' यांच्या चॅट्स परत मिळवल्या आहेत. या चॅट्स शिजानने तिच्या मोबाइलवरून डिलीट केल्या होत्या. डिलीट केलेल्या चॅट्स परत मिळवण्यासाठी वालीव पोलिसांनी शिजानच्या गुप्त मैत्रिणीचा फोन नुकताच जप्त केला होता. शिजान इतर अनेक मुलींशी ही बोलल्याचे समोर आले आहे.**

Mumbai Main
Page No. 8 Jan 08, 2023
Powered by: erelego.com

लोकमत

# लाखोंचा तंबाखूजन्य पदार्थाचा साठा जप्त

## वालीव पोलिसांची कारवाई

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** मुंबई-अहमदाबाद महामार्गावर लाखो रुपये किमतीचा तंबाखूजन्य पदार्थाचा साठा जप्त करण्यात वालीव पोलिसांना यश आले आहे.

बापाणे पोलिस चौकीच्या कार्यक्षेत्रातील मौजे कोली चिंचोटी गावाच्या हद्दीत महामार्गावर वालीव पोलिस गुरुवारी रात्री अडीचच्या सुमारास गस्त घालीत असताना एक टेम्पो संशयास्पदरीत्या आढळून आला होता.

या टेम्पोची झडती घेतली असता त्यात महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला तंबाखूजन्य पदार्थाचा साठा आढळून आला.

पोलिसांनी विविध कंपन्यांचा पान मसाला, तसेच टेम्पो असा एकूण २२ लाख ७१ हजार ८४० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. तंबाखूजन्य पदार्थ जवळ बाळगल्याप्रकरणी चालक वसीम शेख व किशोर या दोन जणांविरोधात शुक्रवारी वालीव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस पुढील तपास करत आहेत.

Hello Vasai
Page No. 1 Jan 08, 2023
Powered by: erelego.com

लोकमत

# महिलेची बदनामी करत विनयभंग

नालासोपारा : विरार येथे एका महिलेची बदनामी करून विनयभंग करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. वैतरणा परिसरात राहणाऱ्या २३ वर्षीय महिलेचे आरोपीसोबत पूर्वी प्रेमसंबंध होते, मात्र लग्नानंतर प्रेमसंबंध संपुष्टात आल्यानंतरही आरोपीने ३० डिसेंबर ते ३ जानेवारीदरम्यान पूर्वी असलेल्या प्रेमसंबंधाबाबत फोन करून तिला जीवे ठार मारण्याची तसेच स्वतः आत्महत्या करण्याची धमकी दिली होती. त्याचप्रमाणे ती काम करत असलेल्या ठिकाणी मालकाकडे तसेच समाजामध्ये तिची बदनामी केली. महिलेच्या तक्रारीवरून शुक्रवारी मांडवी पोलिसांनी विनयभंगाचा गुन्हा दाखल केला आहे.

Hello Vasai
Page No. 1 Jan 08, 2023
Powered by: erelego.com

लोकमत

# विषारी औषध पिऊन आत्महत्या

**नालासोपारा :** ढेकूण मारण्याचे औषध पिऊन नालासोपारा येथे एकाने आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. आचोळे रोड येथील तरला अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या अशोक सोळंकी (वय ४९) यांनी शुक्रवारी सकाळी साडेआठच्या सुमारास दारू पिण्याच्या व्यसनातून घरातील ढेकूण मारण्याचे औषध पिऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता. त्यानंतर त्यांना अलायन्स रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले होते. मात्र डॉक्टरांनी तिथे त्यांना तपासून मृत घोषित केले. आचोळे पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.

Hello Vasai
Page No. 1 Jan 08, 2023
Powered by: erelego.com

पुण्य नगरी

# महिला तक्रार निवारणासाठी पोलीस पुन:धैर्य योजना राबवणार

**मीरा रोड** : मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील पोलीस ठाणे येथे महिलांच्या तक्रारींच्या अनुषंगाने सखोल व यथोचित कार्यवाही होण्याच्या दृष्टिकोनातून 'पुनःधैर्य योजना' राबवणार आहेत. पोलीस ठाणे येथे महिलांच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर चौकशीच्या अनुषंगाने तक्रारदार व गैरअर्जदार यांना समक्ष पोलीस ठाण्यात बोलावून कायदेशीर कार्यवाही करण्यात येते किंवा काही प्रकरणांमध्ये महिला तक्रारदार व गैरअर्जदार यांच्यामध्ये समेट किंवा तडजोड होऊन प्रकरण निकाली काढण्यात येते. मात्र, काही प्रकरणांमध्ये त्या तक्रारी निकाली काढल्यानंतर थोड्या दिवसांनंतर तक्रारदार महिलांना गैरअर्जदार यांच्याकडून परत त्रास होण्याची शक्यता असते. त्यामुळे अशा घटनांना आळा घालण्यासाठी पोलीस आयुक्तांच्या आदेशानुसार 'पुनः धैर्य योजना' राबवण्यात येणार असून, आयुक्तालयातील पोलीस ठाणे येथे मागील एक वर्षापासून प्राप्त तक्रारींमधील महिलांना पोलीस ठाणे येथे बोलावून किंवा त्यांच्याशी संपर्क करून सध्या त्यांना गैरअर्जदार यांच्याकडून कुठल्याही प्रकारचा त्रास अथवा छळवणूक होत असल्यास त्याबाबत विचारणा करण्यात येऊन योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात येणार आहे. हा उपक्रम दर शनिवारी राबवण्यात येणार असून महिला पोलीस अधिकारी, अंमलदार हे तक्रारी हाताळणार आहेत. विभागीय सहा. पोलीस आयुक्त यांचे पर्यवेक्षण व परिमंडळीय पोलीस उपआयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली ही योजना राबवण्यात येणार असून, पोलीस आयुक्त या योजनेचा आढावा घेणार आहेत.

Smart Mumbai Edition
Jan 8, 2023 Page No. 01
Powered by : eReleGo.com

सकाळ

# ज्येष्ठ नागरिकांना पोलिसांनी दिला मदतीचा हात

प्रकाश लिमये, भाईंदर

**ज्येष्ठ नागरिक हे गुन्हेगारांचे सॉफ्ट टार्गेट असतात. रस्त्यात अथवा घरात एकटे गाठून त्यांना लुबाडणे, एटीएम केंद्रात त्यांची फसवणूक करणे असे गुन्हे सर्रास घडतात. त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांना अशा गुन्ह्यांपासून कसे वाचवायचे, पोलिसांशी कसा संपर्क साधायचा, याचे मार्गदर्शन पोलिस स्थापना दिन सप्ताहानिमित्त ज्येष्ठ नागरिकांना मिरा रोड येथे देण्यात आले.**

अनेक ज्येष्ठ नागरिकांना सकाळी अथवा सायंकाळी फिरायला जाण्याची सवय असते. अशा ज्येष्ठ नागरिकांवर पाळत ठेवून त्यांच्या गळ्यातील सोनसाखळ्या खेचून नेल्या जातात किंवा आपण पोलिस आहोत, पुढे एक गंभीर गुन्हा घडला आहे, तुमच्या अंगावरील सोन्याचे दागिने आमच्याकडे सुरक्षित ठेवा, अशी बतावणी करूनही ज्येष्ठ नागरिक लुबाडले जाते. तसेच घरात एकटे राहणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांची घरे लुटल्याचे गुन्हे अनेक वेळा घडले आहेत. एटीएम केंद्रात पैसे काढायला गेलेल्या वरिष्ठ नागरिकांवर तर गुन्हेगारांचे विशेष लक्ष असते. एटीएम केंद्रात पैसे काढण्यासाठी ज्येष्ठ नागरिकांना अनेक वेळा तांत्रिक अडचण येते. एटीएम कार्ड यंत्रात व्यवस्थित टाकले नाही, तर यंत्रातून पैसे बाहेर येत नाहीत. अशा वेळी मदत करण्याच्या बहाण्याने गुन्हेगार पुढे सरसावतात व शिताफीने हातचलाखी करून त्यांच्या बँक खात्यातून पैसे काढतात. ज्येष्ठ नागरिकांची ऑनलाईन फसवणूक झाल्याचेही गुन्हे घडत असतात. गुन्हा घडल्यानंतर तत्काळ पोलिसांशी संपर्क कसा करायचा, याची माहिती ज्येष्ठ नागरिकांना नसते. त्यामुळे गुन्हेगार पसार होतात. अशा



भाईंदर : पोलिस स्थापना दिनानिमित्त फसवणूक टाळण्यासाठी ज्येष्ठ नागरिकांना मार्गदर्शन करण्यात आले.

ज्येष्ठ नागरिकांनी सतर्क कसे राहावे, हे गुन्हे कसे घडतात, त्यातून फसवणूक होऊ नये, यासाठी काय खबरदारी घ्यावी, सकाळी - सायंकाळी फिरायला जाणाऱ्यांनी काय काळजी घ्यावी, यासंदर्भात पोलिसांकडून ज्येष्ठ नागरिकांना सविस्तर माहिती देण्यात आली.

## संकटकाळी ११२ वर संपर्क साधा

पोलिसांशी तत्काळ संपर्क साधण्यासाठी डायल ११२ ही सुविधा सुरू करण्यात आली आहे. या क्रमांकावर संपर्क साधल्यास अवघ्या काही मिनिटांत पोलिस घटनास्थळी दाखल होतात. त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांनी या सुविधेचा अवश्य वापर करून पोलिसांची तत्काळ मदत मिळवावी, असे आवाहन पोलिसांनी यावेळी केले. ज्येष्ठ नागरिकांना येणाऱ्या अडचणी व त्यांच्या समस्याही पोलिसांनी यानिमित्त समजावून घेतल्या.

Mumbai, Palghar-Today
08/01/2023 Page No. 1